खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर

## तृतीय वर्ष कला

सेमिस्टर पाचवे

# इतिहास

CC- ३(३)

# भारतीय राष्ट्रीय आंदोलन (१८८५-१९४७)

# भारतीय राष्ट्रीय आंदोलन (१८८५-१९४७)

## घटक ४ : उपेक्षितांच्या चळवळी

अ) शेतकरी चळवळ

ब) कामगार चळवळ

क) दलित चळवळ

ड) स्त्री चळवळ

इ) आदिवासी चळवळ

# शेतकरी चळवळी

भारतात शेती मुख्य व मानाचा व्यवसाय होता. उत्तम शेती मध्यम व्यापार कनिष्ट नोकरी असे मानले जात असे. शेतकी उत्पादनातून येथे निर्माण झालेल्या समृध्दीमुळे येथे परकीय आक्रमणे होत राहिली. प्राचीन मध्ययुगीन आक्रमक येथेच स्थायीक झाले. त्यामुळे अर्थव्यवस्था व त्यातील उतरंड कायम राहिली. स्वंयपूर्ण खेडी कायम राहिली. शेतसारा प्रमाण फक्त कमी अधिक होत राहिले. मात्र इंग्रजांची सत्ता या सगळयापेक्षा वेगळी होती. स्वतःच्या सत्तेस उपयुक्त व्यवस्था त्यांनी निर्माण केल्या. व्यापारी इंग्रजाच्या कंपनीने स्वतःला फायद्याची महसूल व्यवस्था निर्माण केली. शेतक-यांवरील कराचा बोजा वाढला. दुष्काळाकडे दुर्लक्ष करून सारा वसुली सुरू राहिली. इंग्रजांना फायदयाची तीच पिके घेतली जाऊ लागली. इंग्रजांसाठी आवश्यक कच्चा माल पिकविला जाऊ लागला. त्याची योग्य किंमतही मिळेना. त्याच कच्च्या मालाचा पक्का माल करून इंग्रज चढया किंमतीस विकू लागले. शेतीची दुर्दशा वाढतच गेली. जमीनदार शेती करीत नव्हते. कसणारे जमीनीचे मालक नव्हते. शेतीस अनुकुल शासन धोरण नव्हते. यामुळे शेती उत्पादन घटले. व्यापारीकरणामुळे शेतमालाची निर्यात थांबत नव्हती. जमीनदार सावकार मध्यस्थ दलाल व शासकीय अधिकारी शोषण करत होते. त्यामुळे शेतक-यांची दुःखे वाढतच होती.

आपल्या दुःखास सरकार जबाबदार असल्याचे लक्षात येऊन शेतक-यांनी अनेकदा उठाव केले. संघटना उभारल्या. कॉंग्रेसमध्ये शेतकरी नेते होते पण शेतक-यांना कॉंग्रेसचे धोरण पसंत नव्हते. जमीनदार व शेतक-यांत समझोता व्हावा असा कॉंग्रेसचा प्रयत्न होता तर साम्यवाद्यांनी वर्गसंघर्षाचा पवित्रा घेतला होता. शेवटी शेतक-यांनी स्वतःच्या स्वतंत्र संघटना उभारल्या. बंगाल पंजाब व उत्तर प्रदेशात अशा संघटना निर्माण झाल्या. १९२८ मध्ये आंध्र प्रांतिय रयत सभा १९३१ मध्ये बंगालात पेजेन्टस लीग तर कॉंग्रेसच्या धर्तीवर शेतक-यांची अखिल भारतीय सभा ऑक्टोबर १९३५ मध्ये स्थापन झाली. एन. जी. रंगा व सहका-यांनी ती स्थापन केली. लखनौला ११ एप्रिल १९३६ मध्ये तीचे पहिले अधिवेशन झाले. शेतक-यांच्या आर्थिक हिताचे रक्षण हे तिचे उद्दिष्ट होते. कर्जासाठी मुदत कमी उत्पादन शेतीवर सारा माफी या मागण्या संघटनेने केल्या. शेतमजूरांचे किमान वेतन तसेच ऊस व नकदी पिकांसाठी योग्य भाव सरकारने ठरवुन द्यावा जलसिंचन सोय वाढवावी जमीनदारी नष्ट व्हावी कसेल त्याला जमीन मिळावी अशा मागण्याही करण्यात आल्या. कॉंग्रेसनेही ही या मागण्या कराची व फैजपूर अधिवेशनात उचलून धरल्या.

स्वातंत्र्यानंतर शेतक-याच्या समस्या सुटल्या नाहीत. समस्यामुळे शेतकरी दरिद्री बनला. म्हणून आपल्या मागण्या मान्य करून घेण्यास त्याने चळवळीचा मार्ग स्वीकारला. शेतक-याच्या अनेक समस्या होत्या त्या पुढील प्रमाणे

## शेतक-यांच्या समस्या :

- भारताच्या एकूण लागवड क्षेत्रापैकी दोन तृतीयांश मोसमी पावसावर अवलंबुन आहे. व तो अनिश्चित असल्याने वारंवार दुष्काळाचा सामना करावा लागतो. बिहार ओरिसा राजस्थानचा वाळवंटी प्रदेश व महाराष्ट्राचा उत्तरपूर्व भागात असे दुष्काळ वारंवार पडतात.

- पुरेशा पाण्या अभावी भारतातील बहुसंख्य शेतकरी एकच पिक घेतात. व अशा स्थितीत पाऊस व अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे पिक गेल्यास शेतकयाचे मोठे नुकसान होते.

- भारताच्या विस्तारा बरोबरच येथे जमीन हवामान व सर्व बाबतीत मोठी विविधता आहे. एकीकडे ओला तर दुसरीकडे कोरडा दुष्काळ एकाचवेळी पहावयास मिळतो. गारपिट टोळधाड अतिथंडी बादळ यामुळे पिक नष्ट होतात तर आलेले पिक साठवण्याचीही सोय नसल्याने पिकाचा नाश होतो.

- पाण्यावर शेती अवलंबुन असल्याने दोन वा एक पिक घ्यायचे असल्यास पाणी पुरवठयाची सोय हवी. म्हणून धरणे बांधून शेतीस पाणीपुरवठयाचा प्रयत्न केला जातो. पण एकूण सिंचन क्षमतेपैकी २५ टक्केच वापर झाल्याने शेतकयास उत्पन्न वाढविता येत नाही.

- पारंपरिक शेती अज्ञानामुळे नव्या तंत्रज्ञानाविषयी अज्ञान व महाग असणारे नवे तंत्र  नवे तंत्र वापराबाबतची भीती यामुळे कष्ट अधिक पण उत्पादन कमी अशी येथील शेतीची अवस्था आहे.

- चांगले बियाणे खते किटकनाशके साठवण सोय नवेतंत्र सखोल लागवड लागवड क्षेत्र वाढ यामुळे उत्पादन वाढते पण यासर्वासाठी पैसा लागतो. सरकारने विविध संस्थांमार्फत कर्ज सोय केली. पण जादा कर्जदर कागदपत्रांची अपूर्णता व आधीचेच कर्ज यामुळे शेतकयास योग्य प्रमाणात वेळेवर भांडवल उपलब्ध होत नाही.

- साठवणूक यंत्रणे अभावी शेतकयास आपला माल साठवता येत नाही. वाहतुक साधनांअभावी बाजारात पाठविण्यास अडचणी आहेत. नियंत्रीत बाजारपेठा नाहीत. प्रमाणीत वजनामापांचा अभाव आहे. अडते दलाल यांच्याकडूनही फसवणुक होते. नफा शेतकयांऐवजी मध्यस्थांनाच मिळतो. दोषयुक्त विपनन व्यवस्थेमुळे शेतकयास उत्पादन खर्चही मिळत नाही.

- शेतमालास योग्य भाव मिळत नाही. काही उत्पादनाबाबत सरकार भाव ठरवुन देते. पण तोही शेतकयांच्या दृष्टीने समाधानकारक नसतो. उत्पादन खर्च व त्यासाठी लागलेले श्रम यांचे योग्य मुल्याकंन होत नाही.

- दैववादी व नशीबावर विश्वास ठेवणारा शेतकरी असल्याने त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणारे अनेक घटक समाजात आहेत. व शेतकरी अंधविश्वासाचे बळी ठरत आहेत.

- शेतीच्या विभाजनामुळे लहान धारण क्षेत्रामुळे जमीन कसणे व उत्पादन घेणे आर्थिक दृष्टया शेतकयास परवडणारे नाही. एक तर तोटा सहन करणे किंवा शेती विकून शेतमजूर होणे त्यास आवश्यक ठरत आहे.

# शेतकरी चळवळ

## प्रास्ताविक

इंग्रजांची सत्ता येथे स्थापन झाल्यावर त्यांच्या कर पद्धती व विविध धोरणांमुळे शेतक-यांची स्थिती दयनीय झाली . त्यातून शेतक-यांमध्ये असंतोष वाढत जाऊन ठिकठिकाणी उठाव झाले . अर्थात त्यात एकसंघपणा व देशपातळीवर एकच नेतृत्त्व नव्हते . आपल्या आर्थिक प्रश्नातून स्थानिक पातळीवर हे लढे उभे राहिले . इतर वर्गीयांच्या मदती अभावी व एकसंघा अभावी हे उठाव इंग्रजांना सहज दडपता आले . पुढे राजकीय चळवळी बरोबर घातली जाऊ लागलेली सांगड दळणवळणाची वाढती साधने व जाणीव जागृती यामुळे ही चळवळ लक्षणीय बनत गेली . या चळवळीचा आढावा पुढीलप्रमाणे

**१ . चुमारांचे बंड** ः दुष्काळ व आर्थिक दुरावस्था आणि त्यात सारा वसुली यामुळे मिदनापूर जिल्ह्यातील शेतकरी आदिवासींनी १७६८ मध्ये बंड केले पण ते दडपले गेले .

**२ . पागल पंथीयांचे बंड** ः बंगालात करमशहाचा पागल पंथ हा धार्मिक पंथ होता . करमशहाचा मुलगा टिपू याने जमीनदारांनी शेतक-यांवर चालविलेल्या जुलूमशाहीचा १८२५ मध्ये प्रतिकार केला . इंग्रजांनी हा उठाव लष्कराद्वारे दडपला .

**३ . कोलचा उठाव** ः छोटा नागपूरात कोलांच्या प्रमुखाकडून शीख मुस्लीम शेतक-यांना जमीन देण्यात आली . त्यामुळे असंतोषातून १८३१ मध्ये झालेला उठाव इंग्रजांनी लष्कराच्या साह्याने दडपला .

**४ . फराजी पंथ बंड** ः बंगालात हाजी साहिरीतुल्लांचा फराजी पंथ होता . साहिरीचा मुलगा दाऊमियांने जमिनदारांविरूद्ध शेतक-यांच्या लढयास पाठिंबा दिला . या फराजी बंडाळया १८३८ ते १८५७ या कालावधीत चालू होत्या . पुढे फराजी हे वहावी पंथात विलीन झाले .

**५ . संथाळ उठाव** ः भागलपूर राजमहल दरम्यानच्या प्रदेशात १८५५ मध्ये संथाळांचा उठाव झाला . सावकार पोलीस जमीनदार यांच्यात भरडलेल्या संथाळांनी केलेल्या या उठवाचे नेतृत्त्व सिधु व कान्हु यांनी केले . १५000 लोकांची कत्तल करत इंग्रजांनी हा उठाव चिरडला .

**६ . १८५७ नंतर** ः बंगालात जमीनदार वर्ग इंग्रजनिष्ठ असल्याने इंग्रजांची जमीनदारांबाबत सहानुभूतीची भूमिका होती . त्यामुळे शेतक-यांची पिळवणुक होत राहिली त्यामुळे शेतकरी उठावही होत राहिले .

**७ . नीळीचे बंड** ः इंग्लंडच्या कापड कारखान्यांच्या गरजेतून इंग्रजांनी बंगाल विहारात नीळीचे मळे केले . सोबत परिसरातील शेतक-यांनाही नीळ उत्पादन सक्तीचे केले . त्यामुळे असंतोष वाढू लागला अखेर शासनाला वाढत्या असंतोषाची दखल घेऊन याप्रकारे उत्पादनाची सक्ती करणार नाही असे अश्वासन द्यावे लागले . त्यामुळे अनेक नीळ मळेवाले हिमालयाच्या पाथथ्याकडे स्थलातंरीत झाले .

**८ . बंगालात उठाव** ः जमीनदार शेतक-यांचे मोठे आर्थिक शोषण करत . कुळांवर वाटेल तसे अत्याचार करत . ह्या शेतक-यांनी जमिनदारांविरूद्ध बंड केले . १८७२ ते १८७६ काळात जमीनदारांना खंड न देण्याचे आंदोलन झाले . इंग्रज जमीनदारांच्या मदतीस आले . लष्कराचा वापर केला गेला . अखेर शोषण विरोधी कायदा करण्याचे अश्वासन दिल्यावर हे बंड शमले .

**९.महाराष्ट्रात उठाव** : १८१८ मध्ये महाराष्ट्रात इंग्रज सत्ता प्रस्थापित झाल्यावर त्यांच्या शेतसारा धोरणामुळे उठावास सुरूवात झाली.उमाजी नाईकांनी पश्चिम महाराष्ट्रात रामोशी संघटन करून १८२६ ते २९ काळात लढा दिला.जमीनदार सावकार ब्रिटिश महसुल अधिकारी यांच्यावर हल्ले चढविले.शेवटी इंग्रजांना तडजोडीचे धोरण स्विकारावे लागले.रामोश्यांप्रमाणेच १८२४ ते १८३५ काळात भील्ल व कोळी लोकांनीही उठाव केले होते.

**१०.कॉंग्रेसचा उदय व शेतकरी** : १८८५ मध्ये कॉंग्रेसची स्थापना झाली.पण सुरूवातीच्या याकाळात कॉंग्रेसने शेतकरी प्रश्नाकडे विशेष लक्ष दिले नाही.पुढे महात्मा गांधीजींच्या उदयानंतर कॉंग्रेस शेतकरी प्रश्नाकडे लक्ष देऊ लागली.

**११.कर्झनचे प्रयत्न** : शेतक-यांचा वाढता असंतोष लक्षात घेऊन तो कमी करण्यासाठी १९०० मध्ये कर्झनने पंजाब भूमी हस्तांतर कायदा' केला.या कायद्याने सरकारच्या परवानगी शिवाय जमीन दुस-यास हस्तातंरीत करता येणार नव्हती.यामुळे सावकारी शोषण कमी झाले.तर १९०४ मध्ये कर्झनने 'सहकारी पतपेढी' कायदा केला.यामुळे शेतक-यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध होणार होते.अर्थात शेतकरी प्रश्न इतके व्यापक होते की यासुधारणांमुळे परिस्थिती पूर्ण पालटणार नव्हती.

**१२.चंपारण्य सत्याग्रह** : गोरे नीळ लागवडदार भारतीय शेतक-यांवर जुलूम करत.विशिष्ट क्षेत्र नीळ पिकविण्याची सक्ती करत.या विरूद्ध गांधीजींनी सत्याग्रह केला व हा प्रश्न यशस्वीपणे सोडविला.

**१३.खेडा सत्याग्रह** : खेडा जिल्ह्यात दुष्काळ असतानाही सारा वसुली केली जाई.सरकारी अधिकारी शेतक-यांवर जुलूम करत.गांधीजींच्या सल्ल्याने सरदार पटेलांनी तेथे साराबंदीची चळवळ चालू केली.हा सत्याग्रहही यशस्वी झाला.

**१४.मोपल्यांचे बंड** : कॉंग्रेस व लीग सहयोगातून असहकार व खिलाफत चळवळ एकत्रित सुरू झाली.परंतु असहकार चळवळ मध्येच बंद झाल्याने हिंदु मुस्लिमात तणाव निर्माण झाला.केरळ मलबार भागात मोपला हे मुस्लिम शेतकरी होते.त्यांनी ब्रिटिशांविरूद्ध उठाव केला.लष्कराच्या मदतीने इंग्रजांनी हा उठाव चिरडला.

**१५.मुळशी सत्याग्रह** : पुण्याजवळ वीजनिर्मितीसाठी धरण बांधले जाणार होते.त्यात शेतक-यांची बरीच जमीन जाणार होती.तर तुलनेने मोबदला मात्र अंत्यत अल्प मिळणार होता.सेनापती बापटांनी याविरोधात लढा उभारला.अखेरीस शेतक-यांना मोबदला वाढवुन मिळाला.

**१६.आंध्रात लढा** : आंध्रात अन्यायी जंगल कायदा विरोधात नरसिपट्टण तालुक्यातील शेतक-यांनी आंदोलन केले.अल्लुरी सीताराम राजु यांनी या लढयाचे नेतृत्त्व केले.इंग्रजांनी हा उठाव दडपला.

**१७.अवध कुळ कायदा** : अवध प्रदेशातील जमीनदारा कुळांची पिळवणुक करत.या विरोधात बाबा रामचंद्र यांनी लढा उभारला.अखेरीस वाढता असंतोष लक्षात घेऊन इंग्रजांना १९२२ मध्ये अवध कुळ कायदा करून कुळांना सरंक्षण द्यावे लागले.

**१८.साम्यवादी प्रभाव** : १९१७ मध्ये रशियात साम्यवादी क्रांती यशस्वी झाल्यानंतर त्याचा प्रभाव भारतात पडून येथेही साम्यवादी चळवळींना चालना मिळाली.कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया स्थापन झाली.तर हिंसक मार्ग न रूचल्याने अनेकांनी कॉंग्रसमध्ये राहुनच कार्य करणे पसंत केले.कॉंग्रस मध्येच एक समाजवादी गट स्थापन झाला.पुढे स्वतंत्र समाजवादी पक्ष ही अस्तित्वात आला.या पक्षांनी शेतक-यांच्या प्रश्नावर सतत चर्चा घडवुन आणली. १९१८ नंतर शेतक-यांचे लढे अधिक संघटित रूप धारण करू लागले.तसेच शेतक-यांचे राष्ट्रीय चळवळीशी नाते जोडले गेले.

**१९.कॉंग्रेसचे लक्ष** : कॉंग्रेसचे राजकीय लढयावर लक्ष केंद्रित असले तरी त्यांना शेतकरी प्रश्नाची दखल घ्यावी लागली.प्रो.एन.जी.रंगा व स्वामी सहजानंद यांनी कॉंग्रेसचे लक्ष शेतकरी प्रश्नाकडे वेधण्याचा प्रयत्न केला.१९३६ मध्ये कॉंग्रेसने पहिल्यांदा आपले अधिवेशन खेडयात घेतले.या फैजपूर अधिवेशनातही कॉंग्रेसचे शेतक-यांकडे दुर्लक्ष होत असल्यावरून टिका झाली.

**२०.किसान सभा** : कॉंग्रेस जमीनदार व शेतकरी दोघांनाही धरून होती.त्यामुळे कॉंग्रेसवर टिका होत होती.सर्व शोषक घटकांना विरोध करण्यासाठी संघटना उभारण्यासाठी प्रयत्न होऊ लागले होते.कम्युनीस्ट नेते डॉ.मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रेरणेने बंगाल पंजाब व संयुक्त प्रांतात १९२0 मध्ये किसान सभा स्थापन झाल्या.१९२८ मध्ये आंध्र प्रांतिक किसान सभा संघटित करण्यात आली.

**२0.अखिल भारतीय किसान सभा** : शेतक-यांच्या हित सरंक्षणासाठी व शेतकरी चळवळीला संघटित रूप देण्यासाठी १९३६ मध्ये लखनौला पहिली अखिल भारतीय किसान सभा स्थापन करण्यात आली.विविध प्रांतातील शेतक-यांनी या सभेच्या माध्यमातून शोषणाविरूद्ध लढे दिले.आंध्रात जमीनदारविरोधी चळवळ सुरू झाली.बिहारातही उठाव झाले.काढून टाकलेल्या कुळांसाठी आंदोलन झाले.

## समारोप

किसान सभेची वाढ झपाटयाने झाली.नेतृत्त्वाच्या प्रश्नामुळे सभा मागे पडली.तर १९३५ च्या कायद्याने निवडणुका होऊन अनेक प्रांतात कॉंग्रेसची सरकारे आली परंतु कॉंग्रेस लीग वादात शेतकरी प्रश्नांकडे दुर्लक्षच झाले.त्यामुळे शेतकरी चळवळ समाजवाद्यांच्या प्रभावाखाली गेली.परंतु सभेने केलेली वातावरण निर्मितीमुळे शासनालाही शेतक-यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पहावे लागले.

# कामगार चळवळ

## प्रास्ताविक

इंग्रजकाळात भारतात साधारणपणे १८५0 ते १८७0 दरम्यान आधुनिक उद्योगांची पायाभरणी झाली. येथे कापड लोखंड पोलाद कोळसा रसायने सिमेंट ताग साखर या उद्योगांचा विकास होऊ लागला. भारतात गुंतवणूक केल्यास कच्चा माल नेणे आणणे पक्का माल नेणे आणणे या वाहतुक खर्चात बचत होऊन येथे स्वस्तात मजूर उपलब्ध असल्याने उत्पादन खर्च कमी होऊन नफा अधिक मिळणार होता.यामुळे इंग्रज मोठयाप्रमाणावर भारतात गुंतवणूक करू लागले.येथे खनिज संपत्तीचे मोठे साठे होते.चहा कॉफी नीळ ताग रबर या शेती उद्योगाशी संबंधित असणा-या उद्योगधंद्यांकडेही ब्रिटिशांनी लक्ष दिले होते.रेल्वेच्या विकासामुळे उद्योगधंद्यांच्या विकसाला हातभार लागला.१८५३ मध्ये डलहौसीकाळात येथे रेल्वे धावु लागल्यानंतर रेल्वेचे जाळे वेगाने विस्तारू लागले. १८५४ मध्ये मुंबईत पहिली कापड गिरणी व १८५५ मध्ये बंगालात तागाची गिरणी सुरू झाली.यानंतर पन्नास वर्षात भारतात ठिकठिकाणी कापड ज्यूट व कोळसा इ.उद्योग विकसित होऊन त्यात हजारो मजूर काम करू लागले. उद्योगांच्या विस्ताराबरोबरच कामगारांची संख्याही मोठयाप्रमाणावर वाढली.१८८६ मध्ये कापड गिरणी कामगार ७४000 होते.ते १९0५ मध्ये १९५000 झाले.यावरून कामगारांच्या वाढत्या संख्येचा अंदाज येतो.

मजूरांची संख्या वाढीबरोबरच मजूर विषयक प्रश्नही निर्माण होऊ लागले.पण उद्योगपती कारखानदार व मील मालकांनी त्याकडे दुर्लक्ष केले.सरकारही काही हालचाल करत नव्हते.

## कामगारांचे प्रश्न :

भारतीय मजूरांची स्थिती अत्यंत दयनीय बनली होती.त्यांना अनिश्चित व अपुरे वेतन मिळत असे.कामाची ही खात्री नव्हती.भांडवलदारांकडून त्यांचे शोषण होत असे.अस्वच्छ जागेत अनिश्चित काळ त्यांना काम करावे लागे.शिवाय न पेलवणारा कामाचा बोजा त्यांच्यावर टाकला जाई.मजूरांना कुठल्याही वैद्यकीय सुविधा वा आठवडयास सुट्टी दिली जात नसे.त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचीही सोय नसे.त्यामुळे निरक्षरता आजारपण व कर्जबाजारीपणा यात कामगार भरडला जात असे.शिवाय बालमजूरांचाही प्रश्न होताच.थोडक्यात अनेक कारणांनी कामगारांची स्थिती दयनीय होती.

## कामगारांमध्ये जागृती :

१८७५ मध्येच साधारणपणे कामगार चळवळीला सुरूवात झाली असे म्हणता येईल.सोराबजी शापुरजी यांच्या नेतृत्त्वात ही चळवळ सुरू झाली.या चळवळीने सुरूवातीस फार प्रगती केली नसली तरी चळवळीला सुरूवात झाली.कामगारांच्या राहणीमानाच्या समस्या मोठया होत्या त्या सोडविल्या जाव्यात असे त्यांना वाटत होते.त्यातून कामगारांमध्ये वाढू लागलेला असंतोष १८७५ पासून संपाच्या रूपाने बाहेर पडू लागला.त्यामुळे १८७५ मध्ये पहिला आयोग नेमण्यात आला.कामगारांमधील वाढत्या जागृती मुळे चळवळ दिवसेंदिवस बलाढय होत गेली व अनेक सुधारक नेत्यांनी याचळवळीत मोलाची भर घातली.

थोर समाजसुधारक म.फुले यांनी कामगारांचेही प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले.१८७९ मध्ये त्यांनी मुंबई मजूर संघ स्थापन करून महाराष्ट्रात कामगार चळवळीला सुरूवात केली.बंगालातही शशीपाद बॅनर्जी यांनी कामगार मंडळ स्थापन करून भारत श्रमजीवी या मासिकाचे प्रकाशन सुरू केले होते.यानंतर अनेक संघटना पुढे येऊ लागल्या.१८८० ते ९० मुंबई मद्रास औद्योगिक क्षेत्रात २५ मोठे संप झाले.व रेल्वे कामगार संघ मुद्रण कामगार संघ पोस्ट कामगार संघ अशा काही कामगार संघटना अस्तित्वात आल्या.पण या संघटना स्थानिक व क्षेत्रिय स्वरूपाच्या होत्या.

## नारायण मेघाजी लोखंडे

म.फुले यांचे शिष्य नारायण मेघाजी लोखंडे कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले.म.फुले यांच्या मार्गदर्शनानुसार १८९० मध्ये मुंबई येथे गिरणी कामगारांची पहिली मोठी संघटना स्थापन केली व ख-या अर्थान कामगार चळवळीचा पाया घातला.नारायण मेघाजी लोखंडे यांना कामगार चळवळीचे जनक मानले जाते.ते दीनबंधू वृत्तपत्राचे संपादक होते.कामगारांचे शोषण लक्षात घेऊन कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी कामगारांची पहिली संघटना बॉम्बे मिल हॅन्ड असोसिएशन स्थापन केली.गिरणी कामगारांना रविवारी सुट्टी मिळावी.दुपारी अर्धा तास सुट्टी असावी.जखमी कामगारांना आर्थिक मदत मिळावी व कामावर असताना मृत्यू झाल्यास कुटूंबाला पेन्शन मिळावी अशा मागण्या लोखंडे यांनी केल्या होत्या.दोन गिरण्यांमध्ये संप घडविला.त्यांच्या कार्यामुळे १८९० मध्ये रविवार सुट्टीचा दिवस म्हणून घोषित झाला.१८९१ मध्ये कामगार प्रश्नासाठी नियुक्त रॉयल कमिशन पुढे कामगारांचे प्रश्न मांडले.१८९२ मध्ये फॅक्टरी ॲक्ट पास झाला.कामगारांची चळवळ गतिमान करून कामगारांना न्याय्य हक्क मिळवून देण्यास लोखंडे यांनी सुरूवात केली.कामगार कल्याण साधण्यास सातत्याने संघर्ष केला.सरकानेही त्यांच्या कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन रावबहादुर हा किताब देऊन त्यांच गौरव केला.

## कामगार कायदे :

१८८१ मध्ये सरकारने भारतातील कारखान्यासंबंधी कायदा केला पण तो अपूर्ण होता. कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नांनी लॉर्ड रिपनकाळात पहिला **फॅक्टरी ॲक्ट १८८४** मध्ये पास झाला. या कायद्याने सात वर्षाखालील मुलांना मजूर म्हणून ठेवण्यास बंदी केली. १२ वर्षाखालील मुलांची मजूरी ठरवुन दिली. धोकादायक मशीनला कुंपण घालण्याची सक्ती केली. **१८९१ च्या फॅक्टरी ॲक्टने** स्त्री मजूरांचे कामाचे तास व मजूरी ठरवुन दिली. फॅक्टरी ॲक्टमुळे मजूरांना बरेच सरंक्षण मिळाले.

१९२१ मध्ये वॉशिंग्टनला आतंरराष्ट्रीय मजूर परिषद झाली. या परिषदेच्या शिफारशीनुसार १९२२ मध्ये नवा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार बालमजुराचे किमान वय ९ वरून ११ करण्यात आले. कामाचे तास विश्रांतीसह सहा ठरविण्यात आले. तर प्रौढांसाठी कामाचे तास ११ करण्यात आले. साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक केले. जादा कामाचा वेगळा मोबदला दयावा व कामावर असताना दुखापत झाल्यास नुकसानभरपाई दिली जावी असे निश्चित केले. १९३६ मध्ये खाण कायदा पास करण्यात आला. या कायद्याने खाण कामगारांना अनेक सवलती दिल्या.

१९४७ मध्ये कारखानदार मजूर यांच्यात वाढत्या वादामुळे प्रश्न सामोपचाराने सोडविण्यासाठी औद्योगिक विवाद कायदा पास करण्यात आला. वाद सोडविण्यास कार्यक्षम यंत्रणा उभारण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारवर सोपविण्यात आली. त्यासाठी दोघांची अधिकारक्षेत्रे निश्चित केली. प्रश्न निर्माण केलेल्या समितीकडे न सुटल्यास औद्योगिक न्यायालय किंवा बोर्ड ऑफ कन्सिलीएशनकडे सोपवावेत असे ठरले. पुरेशा पूर्व सूचनेअभावी संप बेकायदेशीर ठरविण्याचा सरकारला अधिकार देण्यात आला. १९४८ मध्ये किमान वेतन कायदा करून असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे शोषण थांबविण्यास पाऊल उचलले. किमान वेतन निश्चितीचा अधिकार राज्य सरकारला दिला. १९४८ मध्ये पास करण्यात आलेल्या फॅक्टरी ॲक्टने आठवडयास कामाचे तास ४८ निश्चित करत एक दिवस पगारी सुट्टी आवश्यक केली. ५०पेक्षा जास्त स्त्रियां जेथे काम करतात तेथे बालसंगोपन गृह आवश्यक केले. मुले व स्त्रीयांना रात्रपाळीस ठेवु नये असे ठरले. १९४८ मध्येच द एम्प्लॉइज स्टेट इन्शुरन्स ॲक्ट पास करण्यात आला. आजारपण बाळांतपण अपंगत्व व अश्रीत यासाठी विमा तरतुद करण्यात आली. त्यासाठी केंद्रिय विमा मंडळ स्थापन करून त्यावर ही जबाबदारी टाकली.

## कामगार संघटना :

नारायण लोखंडे यांनी १८९० मध्ये मुंबईस **गिरणी कामगारांची संघटना** स्थापन केली पण या संघटनेचे नियम तयार केले नव्हते. संघटनेकडे स्वतःचा निधी नव्हता. सभासद यादीही तयार केली नव्हती. यानंतर अनेक संघटना स्थापन होऊ लागल्या तशा या उणीवाही दूर होऊ लागल्या. १८९७ मध्ये भारत **ब्रम्हदेश रेल्वे कर्मचारी संयुक्त संघटना** स्थापन झाली. १९०५ मध्ये कलकत्ता छापखाना संघ १९०९ मध्ये **मुंबई डाक कर्मचारी संघा**ची स्थापना झाली. भिवाजी नरे बाबासाहेब बोले व बॅ. तालपेकर यांच्या

प्रयत्नातून १९१0 मध्ये **कामगार हितवर्धक सभा** स्थापन झाली.कामगारांमध्ये जागृती घडून यावी म्हणून या संघटनेने कामगार समाचार हे साप्ताहिकही चालविले.१४ डिसेंबर १९१९ रोजी या सभेने मुंबईत कामगारांची परिषदही भरविली.

१९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले.उत्पादन व्यवस्था विस्कळीत झाल्याने अनेक वस्तुंची टंचाई निर्माण झाली.त्यामुळे महागाई मोठया प्रमाणावर वाढू लागली.पण मजूरांचे उत्पन्न मात्र कमीच होते.त्यामुळे मजूरांचे प्रश्न गंभीररूप धारण करू लागले.त्यामुळे पहिल्या महायुद्धानंतर कामगार संघटनाही मोठयाप्रमाणावर वाढू व बलाढय होऊ लागल्या.

श्री.बी.पी.वाडीया नेतृत्त्वाखाली मद्रासला १९१८ मध्ये पहिली मजूर संघटना स्थापन झाली.पण उच्च न्यायालयाने कामगार संघाला बेकायदेशीर ठरविले.१९१८ मध्ये म.गांधीजींनी **अहमदाबाद टेक्सटाईल लेबर असोसिएशन** ही कामगार संघटना स्थापन केली.१४000 लोक या संघटनेचे सभासद झाले.या संघटनेने कामगारांना २७.५ टक्के वेतनवाढ मिळवुन दिली.

७ जुलै १९२0 रोजी नारायण जोशी यांनी अनेक कामगार नेत्यांच्या मदतीने **अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेस (AITUC)** स्थापन केली.या संघटनेचे पहिले अधिवेशन ३१ ऑक्टोबर १९२0 रोजी लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेत झाले.या अधिवेशनास मोतीलाल नेहरू अॅनी बेझंट विठ्ठलभाई पटेल बॅ.जीना उपस्थित होते.देशभरातील कामगार संघटनांच्या कार्यात व ध्येयधोरणात सुसूत्रता आणण्यासाठी भारतीय पातळीवर कामगार संघटन केले पाहिजे यासाठी या संघटनेने प्रयत्न केले.६४ कामगार संघटना व १४0८५४ कामगारांना या संघटनेने स्वतःशी संलग्न करून घेतले.यानंतर अनेक व्यावसायिक संघटना स्थापन होऊन संप वा विविध मार्गानी लढा व्यापक होत चळवळ बलाढय होऊ लागली.

१९२३ मध्ये श्री डांगे व केशवराव जोगळेकर यांनी **हिंदुस्थान लेबर सोशालिस्ट पार्टी** स्थापन केली पण तिचा फार विस्तार होऊ शकला नाही.१९२९ मध्ये **AITUC** मध्ये साम्यवाद्यांमुळे फुट पडली.साम्यवाद्यांनी **भारतीय ट्रेड युनियन फेडरेशन (BTUF)** स्थापन केली तर १९३१ मध्ये डाव्यांनी **अखिल भारतीय लाल ट्रेड युनियन कॉंगेस (ABLTUC)** स्थापन केली.कामगारांमध्ये समाजवादाचा प्रसार करून लढाऊ कामगार संघटना उभारण्याचे कार्य साम्यवादी नेत्यांनी केले.त्यात श्रीपाद अमृत डांगे मुझ्झफर अहमद यांचे योगदान मोलाचे होते.

१९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. **AITUC** वर समाजवाद्यांचे वर्चस्व होते.त्यांनी अलिप्ततेचे धोरण स्विकारले होते.१९४७ मध्ये **भारतीय राष्ट्रीय ट्रेड युनियन कॉंग्रेस (INTUC)** स्थापन झाली. स्वतंत्र भारतात मजूरांना प्रतिनिधीत्व देणा-या या संस्थेने बरेच भरीव कार्य केले आहे.जागतिक कामगार संघटनेनेही (**ILO**) इंटकला मान्यता दिली.

स्वातंत्र्यानंतर समाजवादी कॉंग्रेसमधून बाहेर पडले व त्यांनी समाजवादी पक्ष स्थापन केला.कामगार संघटनासाठी त्यांनी **हिंद मजदुर पंचायत (HMP)** स्थापन केली.पूर्वीची **इंडियन फेडरेशन ऑफ लेबर**

(**IFL**) त्यात विलिन केली. हिंद मजदुर सभा व आयटक मधून फुटून निघालेल्यांनी १९४९ मध्ये **युनायटेड ट्रेड यनियन कॉंग्रेस** (**UTUC**) स्थापन केली.

**INTUC AITUC HMS UTUC** या चार संघटनांनी कामगार चळवळीला ख-या अर्थाने पुढीलकाळात दिशा दिली.

## स्वातंत्र्य चळवळीतील कामगारांचा सहभाग ः

स्वतःच्या प्रश्नाबद्दल कामगारांमध्ये जागृती होत असताना राष्ट्रीय जागृतीही होत होती.१९०८ मध्ये टिळकांना अटक झाली तेव्हा मुंबईच्या कामगारांनी उत्स्फूर्त संप केला होता.पंजाबातील दडपशाही व म.गांधीजींना झालेल्या अटकेवरून एप्रिल १९१९ मध्ये अहमाबादच्या कामगारांनी संप करून आंदोलन केले.१९१९ ते २१काळात रेल्वे कामगारांनी रौलट कायद्याविरोधात चळवळ केली.असहकार व खिलाफत चळवळीच्या पाठिंब्यासाठी हरताळ केला.नोव्हेंबर १९२१ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारत भेटीवर बहिष्कार टाकण्याच्या कॉंग्रेसच्या आवाहनानुसार कामगारांनी संप केला.मुंबईतील १४0000 कामगारांनी हरताळ पाळला.सविनय कायदेभंग चळवळीतही कामगारांचा सहभाग होता.सोलापूर गिरणी कामगार कराचीतील गोदी कामगार कोलकाता वाहतूक व गिरणी कामगार व मद्रासच्या गिरणी कामगारांनीही या लढयास आपले योगदान दिले.४ फेब्रुवारी १९३0 रोजी जीआयपी रेल्वेच्या २0000 कामगारांनी हरताळ पाळला.२ ऑक्टोबर १९३९ रोजी युद्धविरोधी निदर्शनात कामगार संघटना आघाडीवर होत्या.चले जाव चळवळीतही अनेक ठिकाणी कामगारांनी संप करून योगदान दिले.१९४६ मध्ये मुंबईत झालेल्या नाविक उठावास संप करून कामगारांनी पाठिंबा व्यक्त केला.थोडक्यात स्वहक्कांसह राष्ट्रीय जाणीवाही कामगारांमध्ये विकसित होताना दिसतात.

## समारोप ः

मर्यादित सभासद असमान वाढ कामगार संघटना आकार लहान पैसा कमी अल्प उत्पन्न भरती सदोष व्यवस्थापन प्रवृत्ती बाह्य नेतृत्त्व ऐक्य अभाव मतभेद निरक्षरता राजकीय पक्षांचा स्वार्थ व कामगारांची उदासीनता असे कामगार चळवळीचे अनेक दोष असले तरी उपरोक्त आढाव्यावरून कामगार चळवळीचा भारतातील विकासाची आपणास माहिति मिळते.

# दलित चळवळ

**प्रास्ताविक**

दलित म्हणजे केवळ अनुसूचित जाती जमातीतील लोक नसून सर्व शोषित हे दलित म्हणून ओळखले जातात.दलित हा शब्द जातिवाचक किंवा कालचा शोषित व आजचा संघर्षशील या अर्थानेही वापरला जातो.तर अनेकजण सामाजिक व आर्थि कदृष्टया दुर्बल असणा-यांना दलित मानतात.

भारतीय समाज विविध जाती व उपजातीत विभागला होता.जन्माधिष्ठीत जातीतून उभ्या राहिलेल्या व्यवस्थेत काही जाती श्रेष्ठ तर काही जाती कनिष्ठ मानल्या गेल्या.कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीतील माणसांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार ही मिळेना.अशा वंचित वर्गासही दलित मानले जाई.जातीयता हा भारतीय समाजाला लागलेला मोठा कलंक होता.१९ व्या शतकाच्या अखेरीस काही सुधारकांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य हाती घेतले होते.ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, थिओसॉफीकल सोसायटी इ.सुधारणावादी संस्थांनी जातीप्रथा निर्मूलनासाठी प्रयत्न केले.म.फुले, राजर्षी शाहू, महर्षी शिंदे, महाराज सयाजीराव गायकवाड, डॉ.आंबेडकर यांनी दलित चळवळीला दिशा दिली नेतृत्त्व केले.दलित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गांधीजींनीही 'हरिजन सेवक संघा'ची स्थापना केली होती.मानवता व राष्ट्रीय ऐक्य या दोन्ही दृष्टीकोनातून दलितांना न्याय दिला पाहिजे असे वाटून येथे दलित चळवळ प्रबळ होत गेली.भारतीय समाजात उपेक्षित शोषित पीडीत व पददलित जनतेच्या उद्धारासाठी सुरू करण्यात आलेली चळवळ म्हणजे दलित चळवळ होय.दलित चळवळीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे...

**१.म.फुले :**

दलितांच्या सुधारणा कार्यात मानवतावादी म.फुले यांचे योगदान फार मोठे आहे.अन्याय व शोषण यांचे बळी ठरलेल्या सर्व घटकांविषयी त्यांना कणव होती.व या घटकांवरील अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.अस्पृश्य समाजाला शोषणापासून मुक्त करण्यासाठी शिक्षित केले पाहिजे असा विचार करून म.फुले यांनी अस्पृश्यांसाठी १८५२ मध्ये वेताळपेठेत स्वखर्चाने शाळा सुरू केली.१८५८ पर्यंत अशा तीन शाळा उघडल्या.१८६८ मध्ये अस्पृश्यांसाठी आपल्या घरातील हौद खुला केला.१७७३ मध्ये 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली.

**२.राजर्षी शाहू महाराज :**

महाराजांनी दलितांमध्ये शिक्षण प्रसारासाठी शाळा वसतिगृहाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. विद्यार्थ्यांना फी माफी दिली. शिवाय उच्चशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन व शिष्यवृत्तीही दिली. दलित सवर्ण अंतर मिटावे यासाठी दलितांनी आपली आडनावे बदलावीत असा विचार त्यांनी मांडला. अनेक जाचक मानहानीकारक प्रथा आपल्या राज्यात बंद केल्या. गंगाराम कांबळेस काढून दिलेले हॉटेल व दत्ता पोवारास दिलेले नगराध्यक्ष पद महाराजांच्या समतावादी दृष्टीची प्रचीती देते. त्यांनी सहभोजने आंतरजातीय विवाह यासही प्रोत्साहन दिले. आपल्या राज्यात दलितांना ५० टक्के राखीव जागा ठेवल्या. राजर्षी शाहू महाराजांप्रमाणेच सयाजीराव गायकवाड महाराजांच्या प्रोत्साहनाने बडोदा संस्थानातही दलित विषयक सुधारणेला सुरूवात झाली.

### ३. ३. गोपाळबाबा वलंगकर व शिवराम जानबा कांबळे

दलित चळवळीमध्ये गोपाळबाबा वलंगकरांचे कार्य फार मोलाचे आहे. गोपाळबाबांनी 'दीनबंधू' व 'सुधारक' साप्ताहिकातून अस्पृश्यताविरोधी पत्रके पसिद्ध केली. १८८९ मध्ये त्यांनी सवर्ण हिंदुंना उद्देशुन 'विटाळ विध्वंसन' हे पत्र प्रसिद्ध केले. १८९० मध्ये दापोली येथे अस्पृश्योन्नतीची चळवळ चालविण्यासाठी अनार्य दोष परिहारक मंडळ स्थापन केले. १८९५ मध्ये पुणे येथे झालेल्या सामाजिक परिषदेच्या अधिवेशनात त्यांनी शाळा, विहिरी, तलाव, धर्मशाळा, विविध व्यापार व सार्वजनिक सेवा यामध्ये दलितांना प्रवेश दयावा अशी विनंती केली. वलंगकरांचे कार्य शिवराम जानबा कांबळे यांनी पुढे चालविले. त्यांनी 'मराठा' व 'दिनबंधू' मध्ये पहिला लेख प्रसिद्ध केला. १९०४ मध्ये त्यांनी 'श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज' ही स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून दलितांना लष्कर व पोलिसात नोकरी व मुलांसाठी शाळा व वाचनालये सुरू करण्यास प्रयत्न केला

### ४. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे ः

१९०६ मध्ये महाराष्ट्रात शिंदे यांनी दलित संघाची (डिस्प्रेड क्लास मिशनची) स्थापना करून दलितोद्धाराचे कार्य केले. अज्ञान जातीभेद जातीद्वेष यामुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता दूर करण्यासाठी शिंदे यांनी प्रयत्न केले. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी अस्पृश्यांच्या परिषदा भरविल्या. राष्ट्रीय सभेच्या कलकत्त्याला भरलेल्या अधिवेशनात अस्पृश्यता निवारण ठराव मंजूर केला गेला. 'अ. भा. निराश्रीत साहाय्यकारी मंडळ' स्थापन करून त्यामार्फत तांदुळ फंड कापड फंड रूपी फंड गोळा केले.

### ५. म. गांधींजी ः

गांधीजींनी १९३५ मध्ये हरिजन सेवक संघ स्थापन केला. दलितांसाठी प्राथमिक शाळा सुरू करणे दलित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे त्यांना पिण्याचे पाणी

उपलब्ध होण्यासाठी विहिरी खोदणे इ.कामे या संघाने केली.म.गांधीजींनी दलितांना मदतीचा हात देत सवर्णांचे मतपरिवर्तन घडवून आणून दलितांवरील अन्याय दूर करण्यासाठी आपल्या चळवळीचा उपयोग केला.

**६.गोपाळबाबा वलंगकर व महादेव जानबा कांबळे**

**७.डॉ.बाबासाहेब आंबेडकर :**

१९२0 पासून डॉ.आंबेडकरांनी दलित चळवळीचे नेतृत्त्व करण्यास सुरूवात केली.दलित समाजाला आत्मसन्मानाचा मार्ग दाखविण्यास आंबेडकरांनी कार्य केले.१९२४ मध्ये बहिष्कृत हितकारीणी सभेचे त्यांनी पुनरूज्जीवन केले.दलितांसाठी वाचनालय दलितांना आर्थिक मदत कर्जाऊ रकमा सवलतीच्या दरात विद्यार्थ्यांसाठी क्रीडा मंडळे सहकारी मंडळे सवर्णासाठी समता संघाची स्थापना केली.सार्वजनिक स्थळे मंदिरे दलितांना खुली करण्यासाठी वेगवेगळी आंदोलने केली.

**६.१.महाडचा सत्याग्रह**

कुलाबा जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळयावळ दलितांना पाणी भारण्यास मज्जाव होता.या तळयाच्या पाण्यावर दलितांचाही हक्क आहे याची जाणीव सर्वांना करून देण्यासाठी १९२७ मध्ये सत्याग्रह करून आंबेडकरांनी हा हक्क मिळवुन दिला.

**६.२.मनुस्मृती दहन**

मनुस्मृती या ग्रंथात जन्माधिष्ठीत वर्णव्यवस्थेचे समर्थन केले होते.या ग्रंथाचा व अशा व्यवस्थेचा प्रतिकात्मक निषेध करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे जाहीरतित्या दहन केले.

**६.३.मंदिर प्रवेश**

मंदिर प्रवेशाचा आमचा हक्क मान्य झालाच पाहिजे म्हणून डॉ.आंबेडकरांनी नाशिक येथे २ मार्च १९३0 रोजी काळाराम मंदिर सत्याग्रह केला.असेच सत्याग्रह अनेक ठिकाणी होऊन गावोगावच्या मंदिरांमध्ये प्रवेशाबाबत असलेले निर्बंध दूर झाले.

**६.४.शिक्षण प्रसार**

अस्पृश्यांच्या शिक्षण प्रसाराकडेही डॉ.आंबेडकरांनी लक्ष दिले.बहिष्कृत हितकारिणी सभेच्यावतीने दलितांसाठी वाचनालये रात्रशाळा सुरू केल्या.१९४६ मध्ये

पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.या संस्थेच्यावतीने मुंबईत सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबाद येथे मिलिंद कॉलेज स्थापन केले.

**६.५.वृत्तपत्रे**

वृत्तपत्रांच्या माध्यमातून चांगली लोकजागृती करता येते म्हणून शाहू महाराजांच्या मदतीने 'मूकनायक' नावाचे वृत्तपत्र सुरू केले.१९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' व १९२८ मध्ये 'समता' व त्यानंतर 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' ही वृत्तपत्रे सुरू केली.

**६.६.राजकीय जागृती**

डॉ.आंबेडकरांनी गव्हर्नर मंडळात काम करताना दलित कल्याणाच्या दृष्टीने विचार मांडले.तसेच दलितांना राजकीय हक्क मिळवुन देण्यासाठीही त्यांनी मोलाचे कार्य केले.विधीमंडळात व शासकीय सेवांमध्ये पुरेशा जागा मिळाव्यात यासाठी गोलमेज परिषदेत आंबेडकरांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली.रॅम्से मॅकडोनाल्डच्या जातीय निवाडयात ही मागणी मान्य होऊन दलितांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आला.परंतु अशा मतदारसंघामुळे हिंदुमध्ये तणाव व फुट निर्माण होईल म्हणून गांधीजींनी उपोषण केले.त्यामुळे डॉ.आंबेडकर व म.गांधी यात चर्चा होऊन पुणे करार झाला. या करारानुसार आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी सोडून दिली.प्रांतिय विधीमंडळात आणि केंद्रिय विधीमंडळात दलितांसाठी १८ टक्के राखीव जागा असाव्यात असे ठरले.त्यानुसार १९३७ मध्ये झालेल्या निवडणूकांमध्ये अनेक दलित लोक कॉंग्रेसच्या माध्यमातून निवडून आले.समान राजकीय अधिकार आत्मनिर्भयतेची भावना वाढावी यासाठी आंबेडकरांनी देशभरातील दलित जनतेला संघटित केले.

**६.७.बहिष्कृत हितकारीणी सभा**

२0 जुलै १९२४ रोजी आंबेडकरांनी बहिकृत हितकारीणी सभा ही संस्था स्थापन केली.शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते.अस्पृश्यांसाठी शिक्षणाचा प्रचार मोफत वाचनालये आर्थिक सुधारणा घडविणे ही ध्येये होती.

**६.८.स्वतंत्र मजूर पक्ष**

१९३६ मध्ये आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.दलित वर्गाचे संघटन करून त्यांनी या पक्षाची स्थापना केली.कायद्याच्या आधारे सुधारणा घडवुन आणणे शेतकरी मजूर दलित अशा लोकांना संघटित जागृत करणे हे पक्षाचे उद्दिष्ट होते.१९३७ च्या निवडणुकीत प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकांमध्ये १५ पैकी १३ जागा बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या मजूर पक्षाने जिंकल्या.

## ६.९.अखिल भारतीय शेडयुल कास्ट फेडरेशन

१९४२ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हा राजकीय पक्ष स्थापन केला. दलित समाजाला संघटित करून अन्याया विरूद्ध लढा दयायला प्रवृत्त करण्यावर त्यांनी भर दिला.१९४६ च्या निवडणुकांमध्ये ३५जागांपैकी १२ उमेदवारांनी विजय मिळविला.

## ६.१०.भारतीय रिपब्लिकन पक्ष

डॉ.आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दिक्षा घेतल्यानंतर या नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली.मात्र डॉ.आंबेडकरांच्या निधनानंतर त्यांच्या अनुयायांनी या पक्षाची स्थापना केली.हा पक्ष म्हणजे भारतीय रिपब्लिकन पक्ष होय.जातीविरहीत धर्म विरहीत रिपब्लिकन पक्ष स्थापन करून देशात सामाजिक तसेच आर्थिक क्रांती घडवून आणण्याची ही सुरूवात होती.पुढे दलित पँथर सह अनेक पक्ष संघटनांनी दलित चळवळीस पुढे नेले आहे.

अर्थात दलितोद्धाराच्या चळवळीत म.फुले कृष्णाराव भालेकर राजर्षी शाहू महाराज महाराज सयाजीराव गायकवाड महर्षी शिंदे गोपाळबाबा वलंगकर शिवराम जानबा कांबळे गणेश गवई कालिचरण गवई किसन बनसोड म.गांधी अशा अनेक नेत्यांसह अनेक संस्थां पक्ष व वृत्तपत्र यांचे व विशेषतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान फार मोलाचे आहे.

## स्त्री मुक्ती चळवळ

### प्रास्ताविक

भारतीय संस्कृतीत मातृदेवता म्हणून स्त्रियांचा गौरव होत असला तरी पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले होते. मनुस्मृतीतील न स्त्री स्वातंत्र्य अर्हती वचना नुसार स्त्रियांना स्वातंत्र्य न देता त्यांच्यावर बंधने लादली गेली होती. पुढे पाश्चात्य शिक्षण, संस्कृतीचे ज्ञान त्यातून आलेली व्यापकदृष्टी उदारमतवाद, मानवतावाद, स्वदोषांची झालेली जाणीव यामुळे स्त्रियांच्या समस्यांची जाणीव सुधारणांचे प्रयत्न सुरू झाले. वर्षानुवर्षाच्या दास्यातून स्त्रियांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. या समस्यांमधून बाहेर पडत माणूस म्हणून जगण्याचा समान अधिकार मिळवण्यासाठी स्त्री मुक्ती चळवळ येथे विकसीत होत गेली. या स्त्री मुक्ती चळवळीचा आढावा पुढीलप्रमाणे

### स्त्रियांचे प्रश्न

मुलगाच पाहिजे या अट्टाहासातून मुलगी झाल्यास तीला मारण्यात येत असे या बालिका हत्यांचे प्रमाण राजस्थान भागात मोठया प्रमाणावर होते. मुलींचा विवाह अल्पवयीन असतानाच करण्यात येत असे. ब-याचदा पाळण्यात असतानाच असे विवाह होत असत. मुलीपेक्षा बरेचदा वराचे वय खुप अधिक असे त्यास जरठबालाविवाह म्हणतात. एक पत्नी जीवंत असतानाच अधिक विवाह करण्याची बहुपत्नीकत्वाची प्रथाही रूढ होती. पतीच्या निधनानंतर सती जाण्याची आमानुष प्रथाही अस्तित्वात होती. विधवांचे जीवन अत्यंत दुःखमय असे. त्यांना पुनर्विवाहाची परवानगी नसे. त्यांना कुरूप करण्यासाठी त्यांच्या डोक्याचे मुंडण म्हणजेच केशवपन करण्यात येत असे. विधवांना मुल झाल्यास त्यांना मारून टाकत. स्त्रियां शिक्षणांपासूनही वंचित होत्या. स्त्रियांना आर्थिक अधिकारही नव्हता. अशा अनेक समस्यांसह स्त्री चूल आणि मूल या चौकटी अनेक अमानुष रूढी, प्रथा, परंपरासंह कैद झाली होती.

### सुधारणांसाठी प्रयत्न

तिला या चौकटीतून काढल्याशिवाय तिला सामाजिक जीवनात आणल्याशिवाय तिच्या समस्या सोडविल्याशिवाय देशाची प्रगती अशक्य असल्याची जाणीव निर्माण होऊ लागली. त्यातून अनेक सुधारक व संस्था पुढे आल्या. त्यांनी स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावला पाहिजे ही जाणीव निर्माण केली. स्त्री सुधारकही पुढे आल्या व स्त्रिया बंधमुक्त होऊ लागल्या. आपल्या क्षमतेनुरूप त्यांनी विविध क्षेत्रात योगदान देत आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा उचलला.

### १. शिक्षण प्रसार व आर्थिक स्वावलंबित्व

१९ व्या शतकाच्या मध्यावर स्त्री शिक्षणविषयक जाणीव व्यापक होत गेली. स्त्री सुधारणा व अन्याय निवारणासाठी शिक्षण आवश्यक असल्याच्या जाणीवेतून शिक्षण प्रसारार्थ प्रयत्न सुरू झाले. ख्रिश्चन मिशनरी व सुधारक भारतीयांच्या प्रयत्नातून स्त्री शिक्षणाची सुरूवात झाली. ख्रिश्चन मिशन-यांनी प्रथम भारतात स्त्रियांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. १८१0 मध्ये बंगालात ख्रिश्चन मिशनयांनी मुलींची शाळा सुरू केली. मिशनरी शाळांमधून इंग्रजी शिक्षण मिळू लागले. १८२४ मध्ये अमेरिकन मराठी मिशनने व १८२८ मध्ये चर्च मिशन सोसायटीने स्त्री शिक्षणाची चळवळ सुरू केली. श्रीमती मार्गारेट यांनी मुंबईत १८३९

दरम्यान मुलींसाठी तीन शाळा चालविल्या.मागारेट यांचे पती जॉन विल्सनयांनी हे कार्य पुढे चालविले.मेरी कार्पेटर यांनी स्त्री शिक्षण प्रसारार्थ कार्य केले.शिक्षीका तयार होण्यासाठी मुंबई अहमदाबाद येथे नॉर्मल स्कुल सुरू करण्यास प्रयत्न केले.तेथे दाखल झालेल्या स्त्रियांना शिष्यवृत्ती मिळण्याची सोय केली. राजा राममोहन व आत्मिय सभेप्रमाणेच महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर यांनी प्रथम स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.स्त्री शिक्षणाचा हिरीरीने पुरस्कार करत म.फुलेयांनी १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली.१८५४ च्या वूड खलित्यात स्त्री शिक्षणाच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला.१८५४ ते १८५८ या काळात ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या प्रयत्नांतून ३५ बालिका विद्यालये उघडली. अनेक नियतकालिकांनीही यासाठी मनोभूमिका तयार केली.कॅनिंगकाळात स्त्री शिक्षण संस्थांना अनुदान देण्याबाबत अनुकुल धोरण स्वीकारण्यात आले.जालंदरला आर्य समाजाने आर्यकन्या विद्यालय काढले.महाराष्ट्रात प्रार्थना समाज व डेक्कन एज्युकेशन सोसायटीने याबाबत कार्य केले.१८८0नंतर आर्य समाजाने स्त्री शिक्षणावर लक्ष केंद्रित केले.सर सय्यद अहमद खान यांनी मुस्लिम स्त्रियांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला.हंटर कमिशननेही स्त्री शिक्षणावर भर दिला.महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी स्वतंत्र संस्था स्थापन केली.जगन्नाथ शंकरशेठ विद्यासागर यांचे प्रयत्नही उपयुक्त ठरले. रखमाबाई यास्त्रीने आपल्या पतीबरोबर राहण्याचे नाकारले.तिच्या पतीने न्यायालयात धाव घेतली व या खटल्यात रखमाबाईचा पराभव झाला.रखमाबाईनी न्यायालयाचा निर्णय मानण्यास नकार दिल्याने त्यांना दंड व जातीबहिष्कृतेस तोंड दयावे लागले.यानंतर त्यांनी इंग्लंडला जाऊन वैद्यकशास्त्रातील एम.डी.ही पदवी प्राप्त केली.शिक्षण विषयक त्यांची बांधिलकी कौतुकास्पद आहे.रखमाबाई पूर्वी आनंदीबाई जोशी यांनी वैद्यकीय पदवी प्राप्त केली होती व भारतातील त्या पहिल्या महिला डॉक्टर होत्या.साधारण १९२0 नंतर स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. स्त्रियांना मालमत्तेचा हक्कही नव्हता.त्यांच्या आर्थिक परावलंबित्वामुळे त्यांचे जीवन अधिकच समस्याग्रस्त बनले होते.स्त्रियांना आपल्या पतीच्या मालमत्तेत त्याच्या उपरांत वाटा मिळावा यासाठी प्रयत्न सुरू झाले.अखेर काही अटी वर त्यांचा मालमत्तेवरील हक्क १९३७ मधील कायद्याने मान्य करण्यात आला.

**२.बालविवाहास, बहुपत्नीकत्व व जरठबालाविवाह, सती व इतर अमानुष प्रथांना विरोध**

बालविवाहाच्या घातक प्रथेस अनेक राजा राममोहन रॉय यांच्यासह अनेक सुधारकांनी विरोध केला.१८२९ मध्ये याबाबतचा कायदाही पारित झाला.पुढे १८६0 मध्ये समंती वयाचा कायदा करण्यात आला त्यानुसार मुलीचे वय कीमान १0 असावे असे ठरविण्यात आले परंतु याकायद्याचा फारसा उपयोग होऊ शकला नाही.कलकत्त्याच्या महिला डॉक्टरांनीही मुलीचे लग्नाचे वय वाढविण्यची मागणी केली.बहरामजी मलबारी यांनीही याबाबतच्या कार्यास हातभार लावला.१८७२ मधील कायद्यानुसार मुलीचे विवाह वय कीमान १४ ठरविण्यात आले.१९0१ च्या कायद्याने हे वय १२ व १९0९ च्या कायद्याने १६ असावे असे ठरविण्यात आले.दयानंदांनी मुलीचे वय कीमान १६ असावे असे मत मांडले.लोकहितवादींनीही यासंदर्भात आपल्या लेखनातून समाज जागृती घडवून आणली.दयानंद तसेच अनेक संस्था सुधारक वृत्तपत्रे यांनी बालविवाह, जरठबालाविवाह, बहुपत्नीकत्व यास विरोध केला.स्वातंत्र्याच्या उंबरठयावर प्रांतिय शासनांनी बहुपत्नीकत्वास विरोध करणारे कायदे पारित केले. सती प्रथेविरूध्द राजा राममोहन यांनी प्रयत्न केले. दक्षता समिती स्थापन केली.त्यांनी केलेल्या कार्यामुळेच बेटिंकला १८२९ मध्ये सती बंदीचा कायदा पारित करता आला.केशवपनाला ही अनेकांचा विरोध होता.दीनबंधू व महात्मा फुले यांचे नाव याबाबत आवर्जुन घ्यावे लागेल.केशवपन विरोधात महात्मा फुले यांनी न्हाव्यांचा संप घडवुन आणला.भ्रुणहत्या टाळण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.१८७५ मध्ये उमीयाशंकर यांनी ही बालहत्या टाळण्यासाठी पंढरपूरला आश्रम काढला.१८0२ मध्ये भ्रुणहत्ये विरोधी कायदा मुंबई इलाख्यात पारितही झाला होता.

**३.विधवा पुनर्विवाह**

विधवांच्या दुःखावरही अनेकांनी प्रकाश टाकत पुनर्विवाहाची गरज प्रतिपादन केली.दुर्गाराम मेहता यांनी १८३८ पासून आपल्या भाषणांमधून या प्रश्नाला वाचा फोडली.विधवाविवाहाला शास्त्र संमती असल्याचे पाराशर संहितेच्या आधारे ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी दाखवुन दिले.विधवा विवाहास उत्तेजन दिले.एवढेच नाहीतर आपल्या मुलाचा विवाहही बालविधवेशी घडवुन आणला.विष्णूशास्त्री पंडित लोकहितवादी फुले भांडारकर जांभेकर यांनी विधवाविवाहास उत्तेजन दिले.जांभेकरांनी पुनर्विवाह प्रकरण हा ग्रंथ लिहिला.दक्षिणेत विरेसलिंगम पंतलू यांनी याबाबत महत्त्वपूर्ण कार्य केले.१८५६ मध्ये विधवा विवाहोत्तेजक मंडळी स्थापना झाली त्यातूनच पुढे १८९५ मध्ये विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळा ची निर्मिती झाली.१८७१ मध्ये मद्रासला

विधवा पुनर्विवाह मंडळी स्थापन झाली . १८५७ मध्ये बाबा पदमनजी यांची यमूना पर्यटन ही विधवांचे दुःख मांडणारी कादंबरी प्रकाशित झाली . १८५६ मध्ये सुधारकांच्या जाणीव जागृतीमुळे कायदाही पारित झाला होता .

**सुधारकांचे योगदान**

भारतात स्त्रियांचे अनेक प्रश्न होते . इंग्रजांनी ते सोडविण्यासाठी कायदे केले . परंतु केवळ कायदे करून हे प्रश्न सुटणे शक्य नव्हते . या सुधारणांसाठी लोकजागृती करणे व कायदा करण्यासाठी सरकारला योग्य पार्श्वभूमी निर्माण करून देणे यावरोबरच मानसिकता वदलविण्याचे अवघड कार्य अनेकांनी केले . त्यापैकी काही सुधारकांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे

**१ . राजा राममोहन रॉय (१७७२ ते १८३३** ः रॉय यांनी स्त्रियांवर असलेली अमानुष बंधने नष्ट करण्यासाठी खुप प्रयत्न केले . त्यासाठी चळवळ सुरू केली . सती प्रथे विरोधात जागृती घडविली . सती वंदी कायदा होण्यासाठी योग्य पार्श्वभूमी तयार केली . ब्राम्हो समाजाच्या माध्यमातूनही स्त्री विषयक सुधारणा कार्य चालविले .

**२ . लोकहितवादी (१८२३ ते १८९२** लोकहितवादी यांनी प्रभाकर या साप्ताहिकातून लिहिलेले लेख शतपत्रे नावाने ओळखली जातात . यामध्ये हुंडाप्रथा, बालविवाह, बहुपत्नीकत्व, विधवा विवाहया समस्यासह स्त्री शिक्षणाची आवश्यकता या विषयावर त्यांनी उद्‌वोधक लेख लिहिले . स्त्री उद्धारासाठी त्यांनी जागृती घडवुन आणली .

**३ . महात्मा फुले (१८२७ ते १८९०** स्त्री मुक्तीच्या वाटचालीत महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे योगदान फार मोठे आहे . १८५१ मध्ये त्यांनी पुण्यात मुलींची शाळा काढली . त्यांची संख्या वाढविली . केशवपन प्रथा बंद पाडली . विधवांच्या मुलांसाठी बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन करून स्वतः अशा मुलास दत्तक घेतले . १८६४ मध्ये विधवा पुनर्विवाह घडवून आणला . सावित्रीबाई फुले यांनी शिक्षिका मुख्याध्यापिका म्हणून भूमिका पार पाडलीच सोबत विधवा पुनर्विवाह घडवून आणणारी संस्थाही स्थापन केली .

**४ . विष्णुशास्त्री पंडित (१८२७ ते १८७६** धर्मग्रंथाचे मोठे अभ्यासक असलेल्या विष्णुशास्त्रींनी स्त्रीविषयक अनिष्ट रूढी परंपरांना धर्माची जोड देणे चुक असल्याचे सप्रमाण दाखवुन दिले . उलट सुधारणांना परंपरांचा आधार असल्याचे सांगितले . इंदुप्रकाश मध्ये स्त्री मुक्तीविषयक लेख लिहिले . स्वतः विधवेशी विवाह केला . पुनर्विवाहोत्तेजक मंडळ स्थापन केले .

**५ . न्या . महादेव गोविंद रानडे (१८४२ ते १९०१** स्त्री शिक्षण प्रौढ विवाह विधवा विवाह जातीभेद निर्मुलन अशा अनेक विषयांचा अनुषंगाने न्या . रानडे यांनी प्रवोधन घडवून आणले . १८६५ मध्ये विधवा विवाहोत्तेजक मंडळ स्थापन केले . स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले . पत्नी रमाबाईस शिकवून सुधारणा कार्यासाठी प्रोत्साहन दिले .

**६ . गोपाळ गणेश आगरकर (१८५६ ते १८९५** आगरकरांनी बालविवाह कायदयाने बंद व्हावा यासाठी प्रयत्न केले . स्त्रियांना स्वयंवराचा अधिकार असला पाहिजे असे त्यांचे मत होते . स्त्री पुरूष समानतेचा आगरकरांनी हिरीरीने पुरस्कार केला .

**७ . महर्षी धोंडो केशव कर्वे (१८५८ ते १९६२** कर्वे यांनी विधवेशी विवाह केला . विधवा विवाहोत्तेजक मंडळ स्थापनेत पुढाकार घेतला . अनाथ बालिकाश्रम काढले . महिला विद्यालाय व महिला विद्यापीठाची स्थापना करून स्त्री शिक्षण प्रसारात मोलाचे योगदान दिले . याशिवाय शशिपाद बॅनर्जी, वीरेशलिंगम पंतलू अशा अनेक सुधारकांचे योगदान ही मोलाचे आहे . सुधारकांच्या या कार्यामुळे स्त्रियांची स्थिती एकदम जरी सुधारली नसली तरी कीमान पुरक परिस्थिती निर्माण झाली . तसेच पंडिता रमाबाई रमाबाई रानडे आनंदीबाई जोशी रखमाबाई या सारख्या स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रात पुढे आल्या .

**स्त्री सुधारक**

स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक सुधारक पुढे आले .त्यामध्ये अनेक स्त्रियांचाही समावेश होता .क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना स्त्री सुधारणांचे अग्रणी मानले जाते .पंडिता रमाबाई **(१८५८ ते १९२२** यांचे स्त्री मुक्ती चळवळीतील योगदान फार मोलाचे आहे .१८२२ मध्ये त्यांनी आर्य महिला समाज स्थापन केला .हंटर कमीशनपुढे साक्ष देताना स्त्री शिक्षणाची आवश्यकता मांडली . पंडिता रमाबाई यांनी वैधव्य आल्यावर ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला . स्त्रीयांचे प्रश्न सांगणारा द हाय कास्ट हिंदू वुमेन हा ग्रंथ १८८७ मध्ये लिहिला .भारतात परत आल्यावर १८८९ मध्ये मुंबईस शारदा सदन (मुक्ती सदान ची स्थापना करून लोकविरोधाला न जुमानता आपले कार्य सुरू ठेवले . या संस्थेचे कार्य पुढे पुणे व नंतर केडगावहून चालविले .१८९३ मध्ये सदनातील दोन मुलींनी ख्रिश्चन धर्म स्वीकारल्याने समाजाच्या कार्याला मर्यादा पडल्या .रमाबाई रानडे यांच्या सेवासदन संस्थेचे कार्य भरीव होते .शारदा सदन प्रमाणेच हिंदू विडोज होम .अनाथबालिकाश्रम या संस्थांचे कार्य ही महत्त्वपूर्ण ठरले .याशिवाय डॉ .आनंदीबाई, तर्खडकर भगिनी, ताराबाई शिंदे, डॉ .रखमाबाई, जनाक्का शिंदे यांचे कार्य ही उल्लेखनीय आहे . १९०९ मध्ये स्वतंत्र महिला परिषदा निर्माण झाल्या .मुस्लिम महिलाच्याही परिषदा निर्माण झाल्या .अशा अनेक संस्था संघटना सुधारक विचारवंत वृत्तपत्र यांच्या कार्यामुळे स्त्रि जीवन पूर्णतः समस्याविरहीत झाले नसले तरी जाणीव जागृती हक्क जाणीव स्त्री शक्तीची प्रचीती आली .बंधमुक्तीच्या प्रकियेला सुरूवात झाली .

**स्त्री मुक्ती चळवळीतील संघटना**

**१ .आर्य महिला समाज** (१८२२ न्या .रानडे व सहकायांनी आर्य महिला समाजाची स्थापना केली .रमाबाई रानडे या समाजाच्या प्रमुख होत्या . प्लेग पूर दुष्काळप्रसंगात समाजाने स्त्रियांना मदत केली तसेच विविध स्त्री प्रश्नांबाबत जागृती घडविली . स्त्रियांमध्ये जागृती घडवुन आणण्यासाठी हा समाज व्याख्यानांचे आयोजन करत असे .

**२ .आत्मनिष्ठ युवती संघ (१९०५** बाबाराव सावरकरांच्या प्रेरणेने नाशिकला हा संघ स्थापन झाला .येसूबाई सावरकरांच्या प्रयत्नाने पन्नासहून अधिक स्त्रियां या संघाच्या सभासद झाल्या .दर शुक्रवारी त्या एकत्र येऊन वृत्तपत्रातील निवडक लेखांचे वाचन करून राजकारणाची माहिती घेत .

**३ .शारदा सदन** (१८८९ शारदा सदनच्या माध्यमातून वंचित स्त्रियांना आधार देण्याचे काम पंडिरा रमाबाई यांनी केले आहे .

**४ .करमणूक क्लब** (१९१७ लाडोराणी झुत्सीयांनी लाहोर येथे करमणूक क्लब स्थापन करून स्त्रियांमध्ये जागृती घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले .

**५ .हिंदु महिला सभा** (१९१८ अवंतिकाबाई गोखले यांनी ही सभा स्थापन केली .मुंबईतील मध्यमवर्गीय स्त्रियांमध्ये शिक्षणाची सामाजिक व राष्ट्रीय कार्याची आवड निर्माण करण्याचे श्रेय या सभेला दयावे लागते .या सभेने हिंदु महिला हे साप्ताहिक ही चालविले .

**६ .देशसेविका संघ** म .गांधींच्या प्रेरणेने पॅटिस कॅप्टन हंसा मेहता जयश्री रामजी अवंतिकाबाई गोखले यशोदाबाई भट कृष्णा घुमटकर या स्त्रियांचा देशसेविका संघ स्थापन झाला .सविनय कायदेभंग चळवळीत या संघाचा मोलाचा सहभाग होता .१९३१ मध्ये सरकारने या संघटनेवर बंदी घातली .

**७ .हिंदुस्थानी सेविका दल** (१९३० डॉ .ना .सु .हर्डीकर यांनी हिंदुस्थानी सेविका दलाची स्थापना केली .कॅप्टन कल्याणी सय्यद या दलाच्या अध्यक्ष होत्या .सरकारने या दलावरही बंदी घातली होती .

**८ .स्त्री सेविका संघ** (१९३६ हा कॉंग्रेसनिष्ठ स्त्रियांचा संघ होता .कॉंग्रेस अधिवेशनात स्वंयसेविका म्हणून हा संघ काम करत असे .

**स्त्रियांच्या राष्ट्रीय संघटना**

१९०४ मध्ये स्त्री मुक्ती साठी भारतमहिला परिषद स्थापन झाली .१९१० मध्ये बंगालात सरालादेवी चौधरी यांनी भारत स्त्री महामंडळ स्थापन केले .अशा संघटनांच्या पार्श्वभूमीवर १९१७ ते १९२७ याकाळात तीन महत्त्वपूर्ण संघटना उदयास आल्या त्या पुढीलप्रमाणे

**१. महिलांची भारतीय संघटना (१९१७ (Women's India Association)**

आयरिश मागरिट कझिन्स यांनी अॅनी बेझंट यांच्या साथीने स्त्रियांची अखिल भारतीय पातळीवर एक संघटना असावी या हेतूने महिलांची भारतीय संघटना स्थापन केली. थिओसॉफीकल सोसायटीच्या कार्यावर या संघटनेचे कार्य आधारीत होते. धर्म शिक्षण राजकारण व लोकोपचार या क्षेत्रात काम चाले. या संघटनेने स्त्रीधर्म हे मासिकही चालविले. स्त्रियांना मताधिकार मिळावा म्हणून या संघटनेच्या स्त्रियांनी मॉटेग्यूची भेट घेऊन त्यास निवेदनही दिले होते. स्त्रियांमध्ये जागृती घडविण्यासाठी संघटना विविध व्याख्यानांचेही आयोजन करत असे.

**२. भारतीय स्त्रियांचे राष्ट्रीय मंडळ (१९२५ (National Council of Women)**

मेहेरबाई टाटा यांनी भारतीय स्त्रियांचे राष्ट्रीय मंडळ ही संघटना मुंबई येथे स्थापन केली. ही संघटना स्वातंत्र्य चळवळीपासून दुर होती. श्रीमंत स्त्रियांची संघटना म्हणूनही ही संघटना ओळखली जाते. दानधर्मावर जगणे कसे चुकीचे आहे हे लोकांना पटवुन देण्याचे काम करण्यात येई. पडदा पद्धत जातीभेद व निरक्षता या तीन दोषांविरोधात या संघटनेने काम केले.

**३. अखिल भारतीय महिला परिषद (१९२७ (All India )**

मागरिट कझिन्स यांच्या प्रयत्नातून या परिषदेची स्थापना झाली. शिक्षण प्रसार रूढीतून मुक्ती मताधिकार व कायदे मंडळात स्थान मिळविण्याचे या परिषदेचे उद्दिष्ट होते. पण पुढे या संघटनेने राजकारणापासून फारकत घेतली.

**स्वातंत्र्य चळवळ व स्त्रियांचा सहभाग**

१९ व्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रीय सभेची स्थापना झाली व या सभेनेही स्त्री सुधारणाविषयक कार्य केले. स्वर्णकुमारी देवी ( रविंद्रनाथ टागोर बहिण , कादंबिनी गांगुली (१९०० कॉंग्रेस मध्ये भाषण , सरलादेवी ( बंगाल स्वदेशी माल दुकान यांचा सुरूवातीच्या काळात राष्ट्रसभा कार्यात सहभाग होता. सुरूवातीस केवळ उच्च कुटुंबातील स्त्रियांचा सहभाग होता. पुढे सर्वच स्तरातील स्त्रियांचा सहभाग वाढला. १९२० मध्ये सभेचे नेतृत्त्व गांधीजींकडे आले. त्यांनी राजकीय कार्यात स्त्रियांना सहभागी करून घेतले त्यामुळेही स्त्रियांमध्ये जागृती घडून आली. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास वाढून सामाजिक व राजकीय जीवनात त्या पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होऊ लागल्या. शोषणा विरूध्द लढण्यास त्या सिध्द झाल्या. गांधीजींच्या चळवळीत स्त्रियां मोठया संख्येने सहभागी झाल्या. त्या निर्भय बनल्या.

कस्तूरबा, वासंतीदेवी दास (सी. आर. दास यांच्या पत्नी, १९२१ मध्ये सत्याग्रह नेतृत्त्व व १९२२ मध्ये प्रांतिक कॉंग्रेस अध्यक्ष , उर्मिलादेवी, इंद्रप्रभा मुजुमदार, राधादेवी (लाला लजपत राय पत्नी पंजाबात कार्य , पार्वतीदेवी, स्वरूपराणी (पंडित नेहरू यांची आई, संयुक्त प्रांतात कार्य , कमलादेवी चटटोपाध्याय (वुमेन लीग फॉर पीस अॅंड फ्रिडम प्राग , हंसाबेन मेहता (ऑनररी मॅजीस्ट्रेट पद त्याग सत्याग्रह सहभाग , सरोजीनी नायडू (१९२५कानपूर कॉंग्रेस अध्यक्ष धारासाण सत्याग्रह , अरूणा असफअली (इन्कलाब पत्रक,१९४२ भूमिगत , सुचेता कृपलानी, उषा मेहता यांचे स्वातंत्र्य लढयातील कार्य महत्त्वपूर्ण ठरले. निवेदिता (पंजाब क्रांतीकारकास मदत , सुशीलादेवी ( बंगाल क्रांतीकारकास मदत , खुर्शिदबेन, कामा (स्टटगार्ट आंतरराष्ट्रीय परिषद , बीना दास (कलकत्ता विद्यापीठात ग. स्टॅन्ले जॅकसन , प्रीतीलता वड्डेदार, कल्पना दत्त, शांती घोष, सुनीती चौधरी (कलेक्टर सिव्हन यांचा क्रांतीकार्यात उल्लेखनीय सहभाग होता. कॅ. लक्ष्मी स्वामीनाथन यांचे आझाद हिंद सेनेतील कार्य महत्वपूर्ण आहे.

**समारोप**

स्त्रियांमध्ये आपल्यावरील अन्यायाबाबत हळूहळू जाणीव निर्माण होत गेली. अनेक सुधारकांनी व संस्थांनी यासाठी प्रयत्न केले. सतीबंदीचा कायदा (१८२९ , विविधा विवाह संमती (१८५६ , नोंदणी विवाह (१८७२ , कामकरी महिलांना सरंक्षण देणारा फॅक्टरी अॅक्ट (१८८१ , प्रॉपर्टी हक्क (१९३७ , पोटगी मागण्याचा हक्क (१९४६ अशा कायदयांनीही त्यास हातभार लावला. स्त्रियांनीही या सुधारणा कार्यात भाग घेतला. नेतृत्त्व केले. राजकीय कार्यातही सहभाग घेत आपल्या कार्याचा ठसा उमटविला.

# आदिवासी चळवळ

## प्रास्ताविक ः

आदिवासी म्हणजे त्या त्या ठिकाणचे मूळ रहिवासी किंवा डोंगर अथवा जंगलाच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना आदिवासी म्हणतात. भारतात आदिवासींच्या चारशे पेक्षा जास्त जमाती विविध भागात वास्तव्य करतात. १९७१ च्या जनगणने नुसार ३ कोटी ८० लाख आदिवासी लोकसंख्या (भारतात ६.९ तर महाराष्ट्रात ९.५ प्रमाण आहे. मध्यप्रदेश ओरिसा बिहार प.बंगाल गुजरात राजस्थान महाराष्ट्र व ईशान्य भारतात प्रामुख्याने त्यांचे वास्तव्य आहे. इशान्य भारतात आदिवासी बहुसंख्येने असून इतर राज्यात ते अल्पसंख्य आहेत. आपली संस्कृती भाषा व चालीरीती जपणे जोपासणे याबाबत या जमाती विशेष संवेदनशील होत्या.

## आदिवासींचे प्रश्न

भारतात इंग्रज सत्ता स्थापन झाली व या सत्ताकारणात राजकीय आर्थिक वर्चस्व स्थापताना येथील समाजव्यवस्था रूढी परंपरा व संस्कृती यांनाही धक्का दिला. त्यातून आदिवासीही सुटले नाही. आदिवासी जमाती स्वातंत्र्यप्रिय होत्या. त्यांची स्वतःची संस्कृती होती. येथे अनेक सत्तातंरे झाली पण आदिवासी जीवनशैली व संस्कृती आबाधित होती. परंतु इंग्रजांच्या विस्तारवादामुळे ही संस्कृती धोक्यात आली. पारतंत्र्य काळात आदिवासींची परिस्थिती बदलत गेली. जीवनात बाजारू प्रवृत्ती शिरल्या. सावकार व्यापारी दलाल सरकारी कर्मचारी या बाहेरच्यांनी त्यांच्या जीवनाचे क्षेत्र व्यापले. त्यातून आदिवासी कर्ज बाजारी झाला. त्यांच्या जमीनी बळकावल्या गेल्या. मजूर म्हणून त्यांची पिळवणूक होतच राहिली. पारंपरिक जीवन पद्धती उध्वस्त झाली. दारिद्रय वाढले. खिस्ती धर्म प्रसारकांनी त्यांच्या कला संस्कृतीवर प्रभूत्व निर्माण केले. त्यातच आदिवासींच्या उपजीविकेचे महत्त्वाचे साधन म्हणजे जंगल पण शेतीसाठीच्या जंगल तोडीने हे उपजीविकेचे साधनच नष्ट होऊ लागले. इंग्रज शासनानेही जंगल वापराबाबत  निर्बंध घातले. पोलीस व वनरक्षकांनी जुलूमाचा कळस गाठला. आदिवासी भागातून मिळणारे लाकूड जंगल संपदेवर मालकी प्रस्थापित करणे  व या भागातून रस्त्यांचे जाळे विणून साम्राज्य दृढ करणे हे इंग्रजांचे धोरण होते. त्यामुळे इंग्रजांनी आदिवासी प्रदेशावर अतिक्रमण सुरू केल्याने आदिवासी संस्कृतीस धोका निर्माण झाला. यामुळे आदिवासींमध्ये मोठयाप्रमाणावर असंतोष वाढून अनेक ठिकाणी आदिवासींचे उठाव झाले. शेतकरी उठावाप्रमाणेच हे उठाव देशपातळीवर संघटित नव्हते तर त्यांचे स्वरूप स्थानिक होते. असे अनेक उठाव भारतात झाले.

### आदिवासींचे लढे (उठाव

१८५७ पूर्वी चुआर जमातीचा उठाव (१७६८ , संन्याशांचा उठाव(१७७० , गोरखपूरचा उठाव(१७८० , विजयनगरचा उठाव (१७९४ , भिल्लांचा उठाव (१८१७ , रामोशांचा उठाव (१८२२ , अहोमांचा उठाव (१८२८ , खासी जमातीचा उठाव (१८२९ , कोळयांचा उठाव (१८२९ , कोल उठाव (१८३१ , मुंडा उठाव (१८२० , कोल्हापूर सावंतवाडी येथील बंडाळया (१८४० ते ४४ , सुरत मिठाची चळवळ(१८४४ , वहाबी चळवळ (१८४९ , संथाळाचा उठाव (१८५५  तर १८५७ च्या उठावानंतर रम्पा उठाव (१८७९ , बाघेरा बंडाळी (१८८१ , कच्छमधील उठाव (१८९९ हे महत्त्वाचे उठाव होते. यातील काही उठावांची माहिती पुढील प्रमाणे

**१. चुआर जमातीचा उठाव** ः दुष्काळ व आर्थिक दुरावस्था आणि त्यात सारा वसुली यामुळे मिदनापूर जिल्ह्यातील चुआर जमातीच्या शेतकरी आदिवासींनी १७६८ मध्ये बंड केले पण ते दडपले गेले. या बंडात दलभूम केलपाल ढोलका आणि विरभूमचे आदिवासी राजे सहभागी झाले होते.

**२.हो जमातीचे बंड** ः छोटा नागपूर भागातील हो या आदिवासी जमातीने असंतोषातून इंग्रज सत्तेविरोधात बंड केले.१८२० ते २२ कालावधीत हे बंड व्यापक झाले.इंग्रजानी हे बंड लष्कराच्या मदतीने चिरडले.

**३.संन्याशांचा उठाव** (१७७० इंग्रज शासनामुळे बंगालात संन्याशांमध्ये असंतोष निर्माण झाला.त्यांनी जनतेला बरोबर घेऊन बंड पुकारले.राज्याच्या तिजोरीवर हल्ला करणे तसेच कंपनी सैनिकांवर हल्ला करणे असे मार्ग त्यांनी निवडले.

**४.मुंडा उठाव** (१८२० बिरसा मुंडा यांच्या नेतृत्त्वाखाली मुंडा जमातीने छोटा नागपूर व सिंगभूम जिल्ह्यात १८९९ दरम्यान इंग्रजांविरूद्ध बंड केले.त्याआधी तीस वर्ष मुंडा सरदार इंग्रज महसुल धोरण व दुष्काळनिती विरूद्ध लढा देत होते.

**५.रामोशांचा उठाव** (१८२२ १८१८ मध्ये महाराष्ट्रात इंग्रज सत्ता प्रस्थापित झाल्यावर त्यांच्या शेतसारा धोरणामुळे उठावास सुरूवात झाली.उमाजी नाईकांनी पश्चिम महाराष्ट्रात रामोशी संघटन करून १८२६ ते २९ काळात लढा दिला.जमीनदार सावकार ब्रिटिश महसुल अधिकारी यांच्यावर हल्ले चढविले.शेवटी इंग्रजांना तडजोडीचे धोरण स्विकारावे लागले.रामोश्यांप्रमाणेच १८२४ ते १८३५ काळात भील्ल व कोळी लोकांनीही उठाव केले होते.

**६.अहोमांचा उठाव** (१८२८ ः अहोम ही आसामातील प्राचीन जमात आहे.ब्रम्ही युद्ध संपल्यावरही अश्वासनाप्रमाणे इंग्रजांनी आपल्या फौजा मागे घेतल्या नाही.उलट अहोमांचा प्रदेश बळकावयाला इंग्रजांन सुरूवात केली यामुळे अहोमांनी बंड पुकारले.१८३३ च्या अखेर पर्यंत हा उठाव चालला.अखेरीस इंग्रजांना तडजोडीचे धोरण स्वीकारावे लागले.

**७.खासी जमातीचा उठाव** (१८२९ ः पूर्वेकडे जंटिया पहाडी प्रदेश व पश्चिमेकडे गारो टेकडया यांच्यातील प्रदेश कंपनी सैन्याने व्यापला.ब्रह्मपुत्रा खो-यातून सिल्हेटला जोडण्यासाठी रस्ता बांधणीची इंग्रजांची योजना होती.ननल्कोच्या राजास आपल्या प्रदेशातील इंग्रजांचा हा हस्तक्षेप सहन झाला नाही.त्याने गारो खम्पा व लिंगपो या आदिवासी जमातींची सहानुभूती मिळवुन उठाव केला.पुढे १८३३ मध्ये इंग्रजांनी हा उठाव चिरडला.

**८.भिल्ल व कोळयांचा उठाव** (१८१७ व १८२९ ः खानदेशातील पश्चिम घाटातील भिल्ल इंग्रजांच्या शेती धोरणामुळे दुखावले गेले व त्यांनी १८१७ मध्ये बंडास सुरूवात केली.इंग्रजांच्या लष्करी तुकडयांचा सामना करत भिल्लांनी आपला विरोध कायम ठेवला.१८२५ १८३१ व १८४६ मध्ये भिल्लांचे पुन्हा उठाव झाले.१८२९ मध्ये भिल्लांचेच शेजारी कोळी जमातीनेही बेकारीतून सातत्याने उठाव केले.

**९. कोलचा उठाव** ः छोटा नागपूरात कोलांच्या प्रमुखाकडून शीख मुस्लीम शेतक-यांना जमीन देण्यात आली.त्यामुळे असंतोषातून १८३१ मध्ये झालेला उठाव इंग्रजांनी लष्कराच्या साह्याने दडपला.१२ .कोल्हापूर सावंतवाडी येथील बंडाळया (१८४० ते ४४

**१०. संथाळ उठाव** ः संथाळांचा उठाव सर्वात संघटित व गंभीर होता.भागलपूर राजमहल दरम्यानच्या प्रदेशात १८५५ मध्ये संथाळांचा उठाव झाला.सावकार पोलीस जमीनदार यांच्यात भरडलेल्या संथाळांनी केलेल्या या उठवाचे नेतृत्त्व सिधु व कान्हु यांनी केले.१५००० लोकांची कत्तल करत इंग्रजांनी हा उठाव चिरडला.

**११.रम्पा उठाव** (१८७९ आंध्रच्या किनारी पहाडी प्रदेशात रम्पा ही आदिवासी जमात वास्तव्यास आहे.इंग्रजांचे जंगल धोरण व जमीन मालकांचे जुलूम यास त्यांनी विरोध केला.इंग्रजांना अनेक तुकडया पाठवुन हा उठाव दडपावा लागला.

**१२ . वाघेरा बंडाळी** (१८८१ ः ओखा मंडलमधील वाघेरा वन्य जमातीचा इंग्रजांना सुरूवातीपासूनच विदेशी सत्तेला विरोध होता . अवास्तव करवसुली विरोधात वाघेरा सरदारांनी १८८१ मध्ये उठाव केला . ब्रिटिश प्रदेशात शिरून त्यांनी लुटालुट केली . पुढे इंग्रजांनी हे बंड मोडले व वाघेरांशी शांततेचा तह केला .

इंग्रजांच्या हस्तक्षेपामुळे स्वातंत्र्यप्रिय आदिवासींनी असे उठाव अनेकदा केले . पुढे ही आदिवासींच्या समस्या कोणत्यान कोणत्या स्वरूपात कायम राहिल्याने आदिवासी उन्नती न्यायासाठी चळवळ उभी राहिली .

## भारतातील आदिवासी

ईशान्य भारतात आदिवासी मोठया संख्येने राहतात . तेथे आदिवासींच्या सुमारे १00 जमाती आहेत . त्यांच्या भाषा व परंपराही वेगवेगळया आहेत . तेथे बाहेरचे लोक वस्ती करणार नाहीत व तेथे स्वातंत्र्य चळवळ पोहोचणार नाही याची इंग्रजांनी काळजी घेतली . तेथे ख्रिश्चन धर्मप्रसाराला चालना दिली . व्हेरिअस एलविन यांनी आयुष्यभर या भागात वास्तव्य करून आदिवासींसाठी कार्य केले . स्वातंत्र्यानंतर त्यांच्या विचारांनुसारच आदिवासी धोरण राबविण्यात आले . आसाम ब्रह्मदेश सीमेवर नागा जमातीची सुमारे पाच लाख लोकसंख्या आहे . त्यांच्यामध्ये अनेक बोली व टोळया आहेत . इंग्रजांनी नागांमध्ये ख्रिश्चन धर्मप्रसारासाठी प्रयत्न केले . त्यातून छोटा सुशिक्षित वर्गही तयार झाला . पुढे स्वतंत्र्यानंतर वेगळे होण्यासाठी फिजोंच्य नेतृत्त्वात तेथे लढा उभा राहिला . आओ या मवाळ नागा नेत्याशी बाटाघाटीनंतर तडजोड करत स्वतंत्र नागालॅंडची राज्याची निर्मिती करण्यात आली . मिझो आदिवासींनीही स्वतंत्र होण्यासाठी लालडेंगाच्या अध्यक्षेत बंड केले पण तडजोड होऊन स्वतंत्र मिझोरम राज्याची निर्मिती झाली . बिहार मधील छोटा नागपूर व संताळ परगण्यात आदिवासी वास्तव्य होते . या प्रदेशास झारखंड म्हणत . याचेच पुढे स्वतंत्र राज्य झाले . संताळ हो ओरावन व मुंडा या प्रदेशातील प्रमुख आदिवासी जमाती होय . शेतीवर प्रामुख्याने त्यांची उपजिवीका चालत असली तरी खाणकामगारांची संख्याही लक्षणीय होती . परंतु हा आदिवासी वर्ग कर्जाच्या विळख्यात सापडला होता .

## महाराष्ट्रातील आदिवासी

महाराष्ट्राच्या सातपुडा सह्याद्री व गोंडवन तीन विभागात १४ जिल्ह्यात २५ आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे . इंग्रजकाळात मिशन-यांनी स्वतःचे हित साधण्यासाठी आदिवासींशी जवळीक साधली . पुढे आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक सुधारक अनेक संस्था पुढे आल्या . अनिष्ट रूढीपासून मुक्तीबरोबरच शिक्षण राहणीमान आरोग्य आर्थिक स्वावलंबन स्त्री उद्धार अशा अनेक क्षेत्रात या सुधारक व संस्थांनी योगदान दिले . त्यातून आदिवासी चळवळ विकसीत झाली .

**१ . ठक्कर बाप्पा**

म . गांधींजींच्या सूचनेनुसार आदिवासी विकासासाठी ठक्कर बाप्पांनी अत्यंत मोलाचे कार्य केले आहे . मुख्यत्वे भिल्लांच्या शैक्षणिक व सामाजिक सुधारणेचे कार्य त्यांनी केले . त्यांच्या कार्याचे मोल लक्षात घेऊन गांधींजी त्यांचा उल्लेख भिल्लांचे धर्म गुरू असा करत .

**२ . शामराव व गोदावरी परूळेकर**

वारली आदिवासींमध्ये परूळेकरांचे कार्य मोठे आहे. किसान सभेद्वारे आदिवासी संघटन व जागृतीचे कार्य शामराव व गोदावर परूळेकर यांनी केले. वारली आदिवासींच्या हक्कांसाठी संघर्ष उभारला. जमीनदार सावकार आदिवासींना फुकट राबवून घेत याविरोधात त्यांनी आंदोलन केले.

**३. ताराबाई मोडक**

समाजसेविका ताराबाई मोडक यांचे ठाणे जिल्ह्यातील कोसबाड येथील आदिवासींसाठींचे शिक्षण कार्य विशेष उल्लेखनीय आहे. तेथे त्यांनी लहान मुलांसाठी अंगणवाडया सुरू केल्या. मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण केली. प्रत्यक्ष कामातून गप्पा वा चर्चातून शिक्षण देण्याची पद्धत त्यांनी राबविली. जनावरे व त्यांच्यासाठीचे कुरण हा आदिवासी जीवनातील महत्त्वाचा घटक असल्याचे ओळखुन कुरण शाळा सुरू केल्या.

**४. पद्मश्री अनुताई वाघ**

ताराबाईंच्या सहवासातून अनुताईनाही समाजसेवेची प्रेरणा मिळाली. त्यांनी कोसबाडला आदिवासी कल्याणासाठी संस्था उभारली. त्याला कोसबाड प्रकल्प म्हणतात. यात प्रामुख्याने शिक्षण प्रसारावर लक्ष केंद्रित केले. पाळणाघरा पासून सुरूवात करत पुढे बालवाडी मग प्राथमिक शाळा करत उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयही स्थापन केले. शिक्षकांसाठी बालसेविका ट्रेनिंग स्कुल व प्रौढासाठीही शिक्षण वर्ग सुरू केले.

याशिवाय इतर अनेक सुधारक व संस्थांचेही योगदान मोलाचे आहे. वारलींवरील सावकारी अन्यायाविरोधातील बाळासाहेब खेरांचा लढाही महत्त्वाचा आहे. जव्हार संस्थानात कॉ. देवकीचरण चौधरी यांनी आदिवासी सेवा मंडळाच्या माध्यमातून मोठे कार्य केले. बापूराव कृष्णाजी देशमुख यांनी आदिवासींच्या सामाजिक आर्थिक उन्नतीसाठी कार्य केले. श्री मारूती वांडे, डॉ. वाडिवे, श्री विश्वेश्वरराव धर्मराव महाराज, श्री बाबूराव मडावी, श्री महादेव कडू, श्री सुखदेव उईके अशा अनेकांच्या योगदानातून आदिवासी चळवळ व्यापक झाली आहे.